# महाराष्ट्र शासन
## भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ आवार, गंगापूर धरणाजवळ, नाशिक ४२२ २२२

Web : www.iasnasik.org.in दुरध्वनी व फॅक्स-०२५३-२२३०१०० E Mail: iasnasik@gmail.com


## सुचना पत्रक

### ऑनलाईन अर्ज करण्याची कार्यपध्दती

### प्रवेश परीक्षा २०१७

UPSC, नागरी सेवा परीक्षा २०१८ (IAS/IPS/IFS) इत्यादी च्या परीक्षा पूर्व प्रशिक्षण २०१७-१८ करिता संस्थेत प्रवेश केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या नागरी सेवा परीक्षा २०१८ च्या पूर्व प्रशिक्षणाकरिता ११ महिने पूर्णवेळ विनामूल्य प्रशिक्षण देण्यासाठी भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक येथे प्रवेशासाठी प्रवेश परीक्षा रविवार, दिनांक १०.१२.२०१७ रोजी फक्त नाशिक केंद्रावर घेण्यात येईल. प्रस्तूत जाहिरातीत नमुद केलेल्या अटींची पूर्तता करणाऱ्या उमेदवारांकडून ऑनलाईन (ONLINE) पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

१. संस्थेच्या प्रवेश परीक्षेकरीता सर्व पात्र उमेदवारांनी अर्ज या कार्यालयाच्या www.iasnashik.org.in या अधिकृत संकेस्थळावर किंवा http://eforms.co.in/PITCN2017/ संकेतस्थळावर दिनांक १५.०९.२०१७ ते १६.१०.२०१७ या कालावधीत सादर करणे आवश्यक आहे. प्रवेश परीक्षा अर्ज स्विकारण्याचा अंतिम दिनांक १६.१०.२०१७ असून त्यानंतर संकेतस्थळावरील अर्ज भरण्याची लिंक बंद होईल.

२. परीक्षेसंबधीत महत्वाची माहिती-

<u>प्रवेश अर्ज ऑनलाईनवर भरण्याचा कालावधी</u>

| अ.क्र. | प्रवेश प्रक्रिया कार्यक्रम | कालावधी | |
|---|---|---|---|
| १ | ऑनलाईन अर्ज भरण्याचा कालावधी | १५.०९.२०१७ | १६.१०.२०१७ |
| २ | भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेमध्ये विहीत चलनाव्दारे प्रवेश परीक्षा शुल्क जमा करण्याचा कालावधी | १८.०९.२०१७ | २३.१०.२०१७ |
| ३ | लेखी परीक्षेसाठी प्रवेशपत्र उपलब्ध होण्याचा कालावधी | ०१.१२.२०१७ | १०.१२.२०१७ |

३. उमेदवारांनी वरील दिलेल्या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्जात संपूर्ण माहिती भरल्यानंतर, (SUBMIT) हा (Option) वापरावा. अर्ज जमा केल्यानंतर भारतीय स्टेट बँकेचे (SBI) शुल्क भरण्याबाबतचे चलन उपलब्ध होईल. सदर चलनाचे प्रिंट काढुन त्या चलनामार्फत उमेदवारांने चलनात आवश्यक असलेले शुल्क त्या दिवशी न भरता दुसऱ्या दिवसापासून वरील दिलेल्या शुल्क जमा करण्याच्या कालावधीत भारतीय स्टेट बँकेच्या (SBI) कोणत्याही शाखेमध्ये कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी विहीत कालमर्यादेत भरावे व आवश्यक शुल्क भरल्याची खात्री करावी. अर्ज जमा (SUBMIT) केल्यानंतर परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे. अन्यथा आपला अर्ज अपात्र ठरेल.

४. परीक्षा शुल्काची आकारणी व शुल्क भरणा प्रक्रिया-

सदर परीक्षेसाठी खालील प्रमाणे शुल्क आकारले जाणार असून सदर प्रवेश परीक्षा शुल्क हे नापरतावा राहिल.

प्रवेश अर्ज फी - चलनाव्दारे रु. ३००/- खुला संवर्गाकरिता

चलनाव्दारे रु. १५०/-		अ.जा./अ.ज./वि.जा./भ.ज./इ.मा.व./वि.मा.प्र.

प्रवेश परीक्षा शुल्क रु. ३००/- व रु. १५०/- हे बँक प्रोसेसिंग चार्जेस वगळून आहेत. याशिवाय स्टेट बँकेकडून जे बँक प्रोसेसिंग चार्ज आकारले जाईल ते शुल्क उमेदवाराने भरावयाचे आहे. प्रवेश परीक्षा शुल्क अधिक रु. ६०/- बँक प्रोसेसिंग चार्ज हे भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत ऑनलाईन अर्ज भरतांना प्राप्त झालेल्या विहीत चलनाव्दारेच रोखीने भरणे आवश्यक आहे.

५. सदर परीक्षेसाठी अर्ज फक्त Online पध्दतीने स्विकारण्यात येतील. Offline व्दारे किंवा इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्विकारले जाणार नाही.

६. प्रवेश परीक्षा अर्ज Online पध्दतीने स्विकारण्यात येत असल्याने अर्ज व कोणतेही शैक्षणिक अर्हतेबाबतचे इतर प्रमाणपत्रे या कार्यालयात पाठविण्यात येऊ नयेत. सर्व प्रमाणपत्रे अंतिम निवड प्रक्रियेमध्ये तपासण्यात येतील. अर्ज भरतांना केवळ स्वाक्षरी व फोटो स्कॅन करुन (फोटो व स्वाक्षरी ची साईज ३५ केबी पेक्षा कमी असणे आवश्यक आहे) अपलोड करावा.

Online पध्दतीने अर्ज भरतांना काही चुका झाल्यास किंवा त्रुटी राहिल्यास कोणत्याही टप्प्यावर अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबधीत उमेदवाराची राहिल, जर उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरतेवेळी कोणतीही चुक केली तर ही दुरुस्ती कार्यालयातून केली जाणार नाही. कार्यालय अशा कोणत्याही अर्जाची जबाबदारी घेणार नाही. उमेदवार सुधारीत अर्ज पुन्हा करु शकतो व त्यांच सुधारीत अर्जाचे चलन बँकेत भरणे आवश्यक आहे. Online अर्जात भरलेली माहिती बदलता येणार नाही. उमेदवारांना Online अर्ज भरण्याबाबत काही अडचणी आल्यास संपर्काकरिता कार्यालयीन वेळेत : फोन नं. ०२५३-२२३०१०० तसेच ०८२९६१७५२५८ या क्रमांकावर संपर्क साधावा.

७. उमेदवाराने अर्ज भरल्यानंतर अर्जावर नमुद केलेला अर्ज क्रमांक (Application No.) व अर्जामध्ये नमूद केलेला पासवर्ड जतन करुन ठेवावा.

८. उमेदवाराने अर्जासोबत माहिती सादर करतांना कार्यान्वीत असलेला भ्रमणध्वनी (मोबाईल) क्रमांक व ई-मेल आयडी नमुद करावा, जेणेकरुन आपणास संपर्क करुन आवश्यक ती माहिती देणे सुलभ होईल. उमेदवारांनी Online अर्जाव्दारे नोंदविलेला भ्रमणध्वनी व ई-मेल आयडी हा अपुर्ण अथवा चुकीचा असल्यास, तसेच मोबाईल क्रमांक NCPR Registered (DND) असल्यामुळे संपूर्ण प्रवेश प्रक्रियेदरम्यान त्याव्दारे पाठविल्या जाणाऱ्या सुचना, संदेश व माहिती उमेदवारांना प्राप्त न झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबधीत उमेदवाराची राहील तसेच या कार्यालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रवेश प्रक्रियेदरम्यान वेळोवेळी सुचना देऊन प्रवेश परीक्षेच्या माहितीबाबत अदयावत राहण्याची जबाबदारी संबधीत उमेदवाराची राहील.

९. ज्या उमेदवारांनी Online नोंदणी केली आहे आणि आवश्यक परीक्षा शुल्क मुदतीत अदा केले आहे. त्यांना प्रवेश परीक्षेचे प्रवेशपत्र (HALLTICKET) त्यांच्या Login आयडी व्दारे अधिकृत संकेतस्थळावरुन डाऊनलोड करुन घेता येईल. कोणत्याही उमेदवारास पोस्टाने प्रवेश पत्र पाठविले जाणार नाही याची नोंद घ्यावी.

१०. प्रवेश परीक्षा केंद्रावर प्रवेशपत्रासह परीक्षा सुरु होण्यापूर्वी एक तास अगोदर उपस्थित रहाणे आवश्यक आहे. उशिरा येणाऱ्या व प्रवेशपत्र न आणणाऱ्या उमेदवारांना प्रवेश परीक्षेकरिता प्रवेश दिला जाणार नाही तसेच, उमेदवारांनी स्वतःचे फोटो असलेले ओळखपत्र उदा. वाहन परवाना, पॅनकार्ड, निवडणूक ओळखपत्र, आधारकार्ड इ. सोबत आणने बंधनकारक राहील.

११. उमेदवारांनी उत्तरे लिहीण्यासाठी अथवा चिन्हांकीत करण्यासाठी फक्त Black Ball Pen चा वापर करावा.

१२. प्रवेश परीक्षा पध्दतः

१) प्रवेश परीक्षा पध्दत : प्रवेश पूर्व परीक्षा एकुण २०० गुणांची असेल, त्यात Section-I, सामान्य अध्ययन, १०० गुणांचा असेल व Section-II सीसॅट, १०० गुणांचा असेल, युपीएससी, नागरी सेवा परीक्षा २०१७

नुसार, गुणवत्ता यादी Section-I, सामान्य अध्ययन या भागातील मिळणाऱ्या गुणांवर आधारीत असेल, Section-II सीसॅट Qualifying असून नागरी सेवा परीक्षा प्रमाणे गुणवत्ता यादी प्रमाणे Section-I, सामान्य अध्ययन च्या गुणांवर अंतिम निवड राहिल.

| विषय | प्रश्नांची संख्या | एकुण गुण | माध्यम | परीक्षेचा कालावधी | परीक्षेचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|
| **Section-I** सामान्य अध्ययन | ५० | १०० | **English** | सकाळी ११.०० ते ०१.०० वाजेपर्यंत एकुण-०२ तास | वस्तुनिष्ठ Objective type (MCQ) Negative marking one-third (0.33) |
| **Section-II (C-SAT)** सामान्य अध्ययन | ४० | १०० | **English** | | |

सामान्य अध्ययन **Section-II (C-SAT)** हा Qualifying Section असल्याने किमान ३३% म्हणजे १०० गुणांपैकी ३३ गुण असणे अनिवार्य आहे.

१३. अभ्यासक्रम-

भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक ची प्रवेश परीक्षा ही नागरी सेवा पूर्व परीक्षा २०१७ च्या अभ्यासक्रमावर आधारीत असेल. प्रवेश परीक्षा वस्तुनिष्ठ Objective type स्वरुपाची आहे. तसेच प्रत्येक चुकीच्या उत्तराला मार्कांच्या १/३ (०.३३) ऐवढे मार्क कमी करण्यात येतील. परीक्षेची वेळ सकाळी ११.०० ते ०१.०० वा. एकुण ०२ तास. तसेच, प्रवेश परीक्षेची प्रश्नपत्रिका इंग्रजी भाषेतच असेल. (प्रवेश परीक्षेचा अभ्यासक्रम सोबत जोडला आहे)

इतर महत्त्वाच्या सूचना :

१. संस्थेतील प्रवेश व मर्यादित वसतिगृह प्रवेश उपलब्धतेनुसार गुणवत्ता व प्रचलित शासन निर्णय नियमांनुसार प्रवेश देण्यात येतील.

२. परीक्षेचा अभ्यासक्रम, परीक्षेसंबंधी सर्व माहिती, सूचना संस्थेच्या www.iasnashik.org.in या वेबसाईट वर उपलब्ध आहे.

३. भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक या संस्थेमध्ये पूर्व परीक्षा/मुख्य परीक्षाकरिता प्रशिक्षण सत्राचा लाभ घेतलेल्या माजी विद्यार्थ्यांना प्रवेश परीक्षेस बसता येणार नाही.

४. केंद्राच्या संपूर्ण प्रशिक्षण काळात उमेदवारास नोकरी अथवा इतर अभ्यासक्रमास सहभाग घेता येणार नाही.

५. वैद्यकीय पदवी धारकांनी Intership पूर्ण करणे आवश्यक आहे.

६. उमेदवार महाराष्ट्राचा अधिवासी असला पाहिजे (Domicile of Maharashtra Certificate) किंवा उमेदवार महाराष्ट्र कर्नाटक वादग्रस्त सीमा भागातील रहिवासी असल्यास शासन निर्णय क्र. रा.प्र.व्य.१०९८/(१७१/९८)/म.शि.-१ दिनांक २४.०४.२००० नुसार महाराष्ट्र कर्नाटक वादग्रस्त सीमाभागातील निर्देशित गाव किंवा शहरातील संस्थेमधून उत्तीर्ण झाल्याचे नमुद करणे आवश्यक असेल. तसेच, अर्जासोबत संबंधित विद्यार्थ्यांचे/विद्यार्थीनीचे पालक महाराष्ट्र कर्नाटक सीमा भागातील रहिवासी असल्याचे जिल्हाधिकारी यांचे प्रमाणपत्र आणि विद्यार्थी पात्रता परिक्षा संस्थेतून झाल्याचे व त्याची/तिची मातृभाषा मराठी असल्याचे तसे संस्थेच्या प्राचार्याचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. तसेच, १० वी ची परीक्षा मराठी विषय घेऊन उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र आवश्यक आहे.

७. प्रवेश परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांनी मोबाईल फोन, माहिती तंत्रज्ञान साधने व किंमती वस्तू जवळ बाळगू नयेत.

८. अर्ज ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने अर्ज व कोणतेही शैक्षणिक अर्हता बाबतचे प्रमाणपत्र या कार्यालयात पाठविण्यात येऊ नये. प्रमाणपत्रे अंतिम निवड प्रक्रियेमध्ये तपासण्यात येतील.

(डॉ. विजय नारखेडे)
संचालक,
भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक.